राष्ट्रकुल (कॉमनवेल्थ) देशांमध्ये मानवाधिकारांच्या वस्तुत: जाणीवेसंदर्भात काम करण्यासाठी

# लॉकडाऊनची सक्ती करताना मानवाधिकारांना लक्षात घेणे:

# पोलिसांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

मार्च 2020

## लॉकडाऊनची सक्ती करताना मानवाधिकारांना लक्षात घेणे

## पोलिसांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

"कोविड-१९ ही समाज, सरकारं, जमाती आणि व्यक्तींची एक कसोटी आहे. कोरोना विषाणूला तोंड देताना एकता आणि सहकार्य दाखवण्याची, आणि कोविड१९चा प्रसार कमी करण्यासाठी, अनेकवेळा बिनधास्तपणे, योजलेल्या उपाययोजनांचे पालन करण्याची आवश्यकता आहे. आर्थिक आणि सामाजिक , नागरी आणि राजकीय अधिकारांसह सर्वच स्तरांवर मानवाधिकारांबद्दल आदर राखणे ही सार्वजनिक आरोग्यासंदर्भातील यशासाठी मूलभूत बाब ठरेल."[१] - **संयुक्त राष्ट्रसंघाच्या उच्चायुक्त, मानवाधिकार कार्यालय**

### उद्दिष्ट

भारतात देशव्यापी लॉकडाऊनची अंमलबजावणी घटनात्मक चौकटीत करण्याच्या महत्त्वाच्या कामासाठी पोलिस खात्याला सहाय्य करण्यासाठी कृतीशील उपाययोजनांचा प्रस्ताव ही मार्गदर्शक तत्त्वे देतात. याच्या अंमलबजावणीसाठी पोलिसांनी त्यांच्या आदेशाचा वापर मानवी, पारदर्शक, जबाबदारीने आणि कोणताही भेदभाव न करता, सेवेशी प्रामाणिक राहून, नेहमीच समाजाच्या मानवाधिकारांबद्दल आदर राखत करणे आवश्यक आहे.

### देशव्यापी लॉकडाऊन

भारताच्या पंतप्रधानांनी कोविड-१९ किंवा कोरोना विषाणूच्या वेगाने पसरणाऱ्या संसर्गामुळे निर्माण झालेल्या जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर, २५ मार्च २०२०पासून २१ दिवसांच्या देशव्यापी लॉकडाऊनची घोषणा केली आहे. या घोषणेमुळे भारतातील १३० कोटी लोकसंख्येला घरातच थांबावे लागेल आणि आपल्या दैनंदिन आयुष्यात योग्य ती महत्त्वाची सावधगिरीची पावले उचलावी लागतील. यामुळे दळणवळण, एकत्र जमणे, रोजगार-व्यवसाय आणि शिक्षणाशीसंबंधित मूलभूत अधिकारांमध्ये सक्तीने मर्यादा येणार आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने परवानगी दिलेल्या अत्यावश्यक सेवांच या कालावधी सुरू राहणार आहेत. लॉकडाऊनमुळे मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले असून समाजाच्या सर्वच थरात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण

---

१. कोविड १९ आणि त्याचे मानवाधिकार परिमाण : https://www.ohchr.org/EN/NewsEvents/Pages/COVID-19.aspx 26 March 2020 ला पाहिलेलेसंयुक्त

झाले आहे. याचा तुलनेने मोठा फटका गरीब आणि दुबळ्या वर्गाला बसतो आहे. या वर्गांना त्याच्या स्वत:च्या आरोग्य आणि त्यांच्या कुटुंबियांच्या सुरक्षिततेच्या चिंतेचा सामना करत समाजासाठीही काम करावे लागते.

दुर्दैवाने देशव्यापी लॉकडाऊनच्या सुरूवातीच्या दिवसांमध्ये सरकारी यंत्रणेकडून मोठ्या प्रमाणावर असंवेदनशीलता आणि अनेकदा क्रौर्याचा अनुभव आला आहे. पोलिसांनी, देशातील सर्वच राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर व्हिडिओमध्ये दिसत असल्याप्रमाणे, अक्षरश: अमानुषपणे वर्तन केले आहे.[२] त्याची न्यायपालिकेने स्वत:हून दखल घेत आणि हस्तक्षेप करत, केरळ उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या लॉकडाऊनच्या कालावधीतील सर्व कारवाईवर देखरेख करण्याचे ठरवले आहे.[३]

*"प्रिंट मीडिया आणि सोशल मीडियामध्ये उपलब्ध असलेल्या विपुल साहित्यामुळे आपण नक्कीच असे म्हणू शकतो की आरोग्य यंत्रणा आणि त्याचबरोबर पोलिस दलाने अतिशय अनुकरणीय काम केले आहे. मात्र त्याचबरोबर वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे आणि सोशल मीडियामध्ये मागील आठवड्यात प्रकाशित झालेल्या काही माहितीकडे आपण डोळेझाक करू शकत नाही. त्यात पोलिसांनी त्यांच्या कर्तव्याचे पालन करताना केलेल्या अतिरेकाची किंवा सक्तीची माहिती आपल्यासमोर येते. त्याचबरोबर आपल्याला नागरिकांच्या मनात त्यांच्या मूलभूत अधिकारांच्या उल्लंघनासंदर्भात असलेली भीतीदेखील कमी करायची आहे. त्यामुळेच आम्ही अशा मताचे आहोत की केंद्र किंवा राज्य सरकारांनी लागू केलेल्या लॉकडाऊनची अंमलबजावणी न्यायपालिकेच्या देखरेखेखाली असली पाहिजे. याच पार्श्वभूमीवर सरकारच्या लॉकडाऊनच्या कालावधीमधील कारवाईला न्यायपालिकेच्या देखरेखेखाली घेण्याच्या कोर्टाच्या भूमिकेला आम्ही योग्य समजतो."*[४]

या सार्वजनिक संकटाच्या वेळी मोठ्या प्रमाणावर नागरिक पोलिसांकडून व्यावसायिकता, संरक्षण, सहाय्य आणि मार्गदर्शन यांची अपेक्षा बाळगतात. समाजाच्या सर्वच थरातील लोकांना किमान त्रास होईल असे पाहत लॉकडाऊनची अंमलबजावणी करणे यात पोलिसांची वेगळी भूमिका आहे

---

२ देशभरात लॉकडाऊन लागू होत असताना ऑर्डर घेऊन जाणाऱ्या डिलिव्हरी बॉईजला पोलिसांची निर्दयपणे मारहाण https://www.indiatimes.com/news/india/delivery-guys-carrying-orders-beaten-up-mercilessly-by-police-as-country-enters-lockdown-509233.html?fbclid=IwAR1OgeshOLRR_AHK1Jj8wTbUS0IaQx0hOPzhaSc_l9g8wYnv8-x4muEZzxU, २६ मार्च २०२० वाचल्याप्रमाणे, "15,000 लीटर दूध, १०,००० किलो भाजीपाला फेकून दिला" : विक्रेत्यांचा पोलिसांवर आरोप, https://www.ndtv.com/india-news/coronavirus-india-lockdown-e-tailers-complain-police-beating-up-deliveryagents-2200587, २६ मार्च २०२०ला वाचल्याप्रमाणे, विचित्र आणि नाविन्यपूर्ण मार्गांचा अवलंब करत भारतीयांनी लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करावे याची पोलिसांनी खातरजमा केली, https://theprint.in/india/quirky-and-innovative-ways-in-which-policemade-sure-indians-follow-lockdown-rules/388085/ ,२६ मार्च २०२०ला वाचल्याप्रमाणे

३ लॉकडाऊनच्या काळात देखरेख करण्याच्या महत्त्वाच्या भूमिकेचे अनुकरण इतर राज्यांची उच्च न्यायालयेदेखील करतीन अशी आशा आहे.

४ केरळ उच्च न्यायालयाने ३० मार्च २०२० ला स्वत:हून याचिका दाखल करून घेतली (२०२०ची क्रमांक नसलेली): http://highcourtofkerala.nic.in/lat_orders/suomotu_un_wpc_of%202020dtd30032020.pdf

आणि पोलिसांनी लोकांच्या विश्वास आणि सहकार्याचा पाया तयार केला पाहिजे. अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी आणि पुरवठा साखळी सुरळीत राहण्यासाठी पोलिस हे महत्त्वाचे संपर्क बिंदू आहेत. कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीच्या सर्व बाबींची खातरजमा करत सर्व पोलिस कारवाई ही सहानुभूतीपूर्वक, मानवाधिकार आणि मानवतेविषयी कायमस्वरुपी आदर राखत, जनतेची सेवा या मनोभूमिकेतून झाली पाहिजे. हीच एकमेव बाब भीती कमी करू शकते, गोंधळ दूर करू शकते, विश्वास आणि एकता निर्माणम करू शकते. इथे उल्लेख केलेल्या मूल्यांचा आदर राखण्यानेच या अभूतपूर्व लॉकडाऊन आणि सार्वजनिक आरोग्याच्या संकटाला यशस्वीरित्या तोंड देता येईल.

## मार्गदर्शक तत्त्वे

पुढील सूचनांची मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरुपात सर्व राज्यांच्या पोलिस खात्यांना सीएचआरआय शिफारस करते.

### लॉकडाऊन व्यवस्थापन योजना[५]

प्रत्येक राज्यातील पोलिस दलाच्या प्रमुखांनी एक समग्र लॉकडाऊन व्यवस्थापन योजना (यानंतरची योजना) लवकरात लवकर विकसित केली पाहिजे. ही योजनेद्वारे पोलिसांच्या भूमिकेची रुपरेखा तयार केली पाहिजे. पदाचा मोठेपणा न दाखवता लॉकडाऊनची अंमलबजावणी करण्यातील आपल्या भूमिकेचे पोलिस अधिकाऱ्यांना आकलन होईल आणि त्यांची कृती ही वेगवान, वाजवी, योग्य आणि समावेशक असावी आणि त्यांच्यात योग्य निर्णय क्षमता वाढीस लागावी, अशा पद्धतीने या योजनेची रुपरेखा तयार करण्यात आली पाहिजे. प्रत्यक्ष कारवाई करतानाच्या सर्व बाबींचे त्यात व्यावहारिक मार्गदर्शन त्यातून देता येईल. त्यामध्ये लोकांचे व्यवस्थापन, अत्यावश्यक सेवांचे सुलभीकरण, बलाचा किमान वापर, अत्यल्प अटक, कमकुवत लोकांपर्यंत पोचण्यासाठीची पावले, विषाणूच्या प्रसाराला आळा घालण्यासाठीचे संरक्षणात्मक उपाय, याबरोबरच अंतर्गत रिपोर्टिंग, देखरेख, जबाबदारी आणि सर्वच थरांवर संवादाची आवश्यकता यांचा समावेश असेल. यामुळे प्रत्यक्ष कारवाईच्या ठिकाणी पोलिसांना योग्य माहिती असेल आणि ते

---

[५]सर्व राज्य पोलिस मुख्यालय कार्यालयांना, महानगरांच्या पोलिस आयुक्तांना आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या प्रमुखांना इंडियन पोलिस फाऊंडेशनने दिलेल्या सूचनांची , ज्यामध्ये महामारीला हाताळण्यासाठीची योजना तयार करण्याचा सल्ला देण्यात आला आहे, सीएचआरआय दखल घेते. या मार्गदर्शक तत्त्वांचा मसूदा तयार करणे हा आमच्या पोलिस खात्यांना सहाय्य आणि मदत करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक भाग आहे, ज्यायोगे पोलिसांना त्यांच्यासमोर असलेल्या सध्याच्या आव्हानांना तोंड देता येईल.

जबाबदारीनेही वागतील याची खात्री येईल. अपेक्षित निकालासाठी राज्य सरकारांनी शहरी आणि ग्रामीण भागासाठी गरजेनुरुप स्वतंत्र योजना बनवाव्यात.

स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर (एसओपी)च्या स्वरुपात या बाबी मुद्देसूदपणे, स्पष्ट आणि योग्य मांडणीद्वारे प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी लिखित स्वरुपात असाव्यात. ही एसओपी सर्व कर्मचाऱ्यांच्या, विशेषत: जे प्रत्यक्ष काम करत आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्यापर्यंत पोचण्यासाठी सोप्या पद्धतीने पडताळता येईल अशा चेकलिस्ट्स किंवा पॉकेट बुकच्या रुपात पुस्तकी स्वरुपात वाटता येईल किंवा सहज पाहता येईल अशा पद्धतीने डिजिटल स्वरुपात मोबाईल फोन आणि संगणकावर त्या त्या राज्याच्या भाषेत आणि जिथे शक्य असेल तिथे, हिंदी व इंग्रजी भाषेत उपलब्ध करून देता येईल. विभागाच्या विस्तृत कामकाजाचे मार्गदर्शन म्हणून ही एसओपी राज्य/जिल्हा पोलिस वेबाईटवर अपलोड करण्यात यावी, वेगवेगळ्या पोलिस युनिटमध्ये विशेषत: पोलिस स्टेशनमध्ये आणि मोबाईल पेट्रोल युनिटमध्ये ती मांडलेली असावी. ही योजना सर्वसामान्यांना सहजपणे उपलब्ध असावी यासाठीच्या सर्व उपाययोजना केल्यामुळे नागरिकांमधील जागरुकता वाढीस लागेल आणि त्यामुळे नागरिकांचे सहकार्य पोलिसांना मिळू लागेल.

शारीरिक अंतर राखण्याची आवश्यकता आणि लोकांनी एकत्र जमण्यावर असलेले निर्बंध, त्याचबरोबर पोलिसांचा सर्व वेळ सध्याचे संकट तात्काळ हाताळण्यात जात असल्यामुळे, या योजनेचे संस्थांत्मक प्रशिक्षण देणे याक्षणी अवघड असणार आहे. याला पर्याय म्हणून देखरेख करणारे अधिकारी, विशेषत: जिल्हा पोलिस प्रमुख, पोलिस स्टेशनचे प्रमुख आणि युनिट प्रमुख त्याच्या पातळीवर लक्षाधारित सत्रे घेऊ शकतात ज्याद्वारे त्यांच्या कनिष्ठ सहकाऱ्यांना किंवा स्टाफला या योजनेबद्दल आणि त्यातील तरतूदींबद्दल अभिमुख करता येईल.

स्थानिक संदर्भात या योजनेचा सर्वांगीण आराखडा बनवण्यासाठी पोलिस प्रमुख किंवा वरिष्ठ अधिकारी हे सर्वात उपयुक्त आहेत, पुढील मुद्द्यांचा समावेश, प्रत्येक योजनेत, अमंलात आणण्यायोग्य उपाययोजनांद्वारे करण्याचा आग्रह सीएचआरआय धरते.

**उपाययोजनांचा सारांश**

**कोविड-१९ विरोधात संरक्षणात्मक उपाय**

*अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांप्रमाणेच, पोलिसांच्या कामाच्या स्वरुपामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना विषाणूचा संसर्ग होण्याची आणि त्यांच्याद्वारे तो पसरण्यासाठी मोठी जोखीम आहे. पोलिस स्टेशनमधील आणि रस्त्यावर काम करणारे पोलिस या सर्वांनी पूर्णवेळ कोरोनाशी संबंधित उपाययोजनांना अंमलात आणणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जे पोलिस अधिकाऱ्यांवर पोलिस कोठडीची जबाबदारी आहे त्यांनी कोठडीत असणाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.*

**बळाच्या किमान वापरासंदर्भातील मार्गदर्शन**

*सर्वसामान्यांच्या दैनंदिन कामकाजावर आलेल्या अभूतपूर्व निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर, लॉकडाऊनच्या अंमलबजावणीसाठी बळाचा वापर करणे टाळलेच पाहिजे. अहिंसक मार्गांचाच वापर करण्यात आला पाहिजे.*

**अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना इप्सित स्थळी पोचू देणे आणि त्यांना पूर्ण सहकार्य करणे**

*अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी आणमि नागरिक यांच्यात पोलिस हे महत्त्वाचा संपर्क बिंदू आहेत. यामुळे अत्यावश्यक सेवा फक्त सुरळीत अंमलात येत नाहीत आणि लोकांपर्यंत पोचत नाहीत तर त्यामुळे अनेकांचे जीवदेखील वाचू शकतात. पोलिसांच्या भूमिकेतील ही महत्त्वाची बाब असून त्याला प्राधान्य दिले पाहिजे.*

**थांबवणे, तपास आणि साहाय्य करण्यासाठी विशिष्ट कार्यपद्धती**

*रस्त्यावर आढळणाऱ्या लोकांचे नियमन आणि त्यांना सहाय्य करणे, लोकांना प्रश्न विचारणे आणि त्यातून अपेक्षित उत्तरे यासाठी सोपी, व्यवहार्य, अंमलात आणण्यास सोपी अशा कार्यपद्धती किंवा प्रोटोकॉलमुळे पोलिसांचे काम विनाअडथळा पार पडेल.*

**अनावश्यक अटक आणि स्थानबद्धतेसंदर्भात मार्गदर्शन**

*अनावश्यक अटक टाळण्यासाठी लॉकडाऊनचे उल्लंघन केल्याबद्दल कोणतीही अटक होता कामा नये हा आग्रह आहे. कोठडीत एकमेकांच्या संपर्कात आल्याने लोकांना आणि पोलिस कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी शक्यतो लॉकडाऊनशी निगडीत सर्व अटक टाळल्या पाहिजेत.*

**पोलिसांच्या गैरवर्तनासाठी जबाबदारी**

*लॉकडाऊनचे व्यवस्थापन करताना, विशेषत: बळाचा वापर करताना, अटक करताना, जनता*

*आणि अत्यावश्यक सेवांचे व्यवस्थापन करताना, स्थापित नियम आणि कार्यपद्धतीचे उल्लंघन करताना किंवा पालन न करताना, पोलिस कर्मचारी आढळल्यास त्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात आली पाहिजे.*

**दुर्बल घटकांना संरक्षण देण्यासाठी विशेष उपाययोजना**

*काही दुर्बल घटकांना मदत आणि सेवा मिळवण्यासाठी प्रचंड अडचणींना तोंड द्यावे लागते, लॉकडाऊनच्या काळात याची तीव्रता आणखी वाढेल. अशा घटकांची आणि नागरिकांची ओळख पटवणे हे अतिशय महत्त्वाचे ठरते. कारण हे घटक, दळणवळण आणि संभाषणावरील लॉकडाऊनच्या निर्बंधांमुळे आणखी वंचित राहू शकतात.*

**प्रतिसाद देताना भेदभाव नको**

*पोलिसांनी जनतेला प्रतिसाद देताना भेदभाव करता कामा नये आणि भेदभावाच्या कोणत्याही घटनेसंदर्भात सतर्क राहिले पाहिजे.*

**नियमित आणि स्पष्ट संवाद, सर्वच पातळ्यांवर, अंतर्गत आणि लोकांशी**

*लॉकडाऊनच्या कालावधीत, लॉकडाऊनच्या व्यवस्थापनाची योजना, त्यातील नव्या घडामोडी आणि केल्या जाणाऱ्या उपाययोजना यासंदर्भात पोलिस दलातील सर्वच पातळ्यांवर अंतर्गत आणि जनतेशी सातत्यपूर्ण संवादाची खबरदारी पोलिस नेतृत्वाने घेतली पाहिजे.*

## I. कोविड-१९ विरोधात संरक्षणात्मक उपाय

*अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांप्रमाणेच, पोलिसांच्या कामाच्या स्वरुपामुळे पोलिस कर्मचाऱ्यांना विषाणूचा संसर्ग होण्याची आणि त्यांच्याद्वारे तो पसरण्यासाठी मोठी जोखीम आहे. पोलिस स्टेशनमधील आणि रस्त्यावर काम करणारे पोलिस या सर्वांनी पूर्णवेळ कोरोनाशी संबंधित उपाययोजनांना अंमलात आणणे हे अत्यंत महत्वाचे आहे. जे पोलिस अधिकाऱ्यांवर पोलिस कोठडीची जबाबदारी आहे त्यांनी कोठडीत असणाऱ्यांना कोरोनाचा संसर्ग होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.*

१. प्रत्यक्ष कृतीशील पोलिस कर्मचाऱ्यांना कोविड-१९पासून संरक्षणासाठी पुरेशी साधने ज्यात मास्क, ग्लोव्हज आणि सॅनिटायझर उपलब्ध करून देण्यात आले आहे याची खात्री करणे.

२. ऑफिस असो पोलिस स्टेशन पूर्ण वेळ एकमेकांपासून तीन फूटांचे[६] शारीरिक अंतर राखण्याच्या सूचना सर्व पोलिस कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात. शिवाय रस्त्यांवर :

अ. मीटिंग किंवा सूचना देताना शारीरिक अंतर राखण्यासंदर्भातील खबरदारी घेतली जाते आहे याची खात्री करणे

ब. पोलिस नियंत्रण कक्ष (पीसीआर), पोलिस व्हॅन आणि इतर पोलिस वाहनांमधील पोलिस कर्मचाऱ्यांनी शारीरिक अंतर राखण्याच्या सूचनेचे पालन केले पाहिजे.

क. पोलिसांसाठी असलेल्या मोटरसायकर किंवा दुचाकीवर फक्त एकच कर्मचारी असेल याची कसोशीने अंमलबजावणी व्हावी.

३. सर्व कार्यालये, पोलिस स्टेशन, आउटपोस्ट, चौक्या, पोलिस नियंत्रण कक्ष व्हॅन आणि सर्व पोलिस वाहनांचे दररोज निर्जंतुकीकरण करण्यात यावे.

४. सर्व प्रशासकीय युनिटमध्ये पुढील गोष्टी कार्यान्वित करण्यात आलेल्या आहे यासाठी सर्व उपाययोजना कराव्यात:

अ. स्वच्छ नियमित नळाचे पाणी आणि हाथ धुण्यासाठीच्या सुविधा पुरवण्यात याव्या

ब. प्रत्येक युनिटमधील कर्मचाऱ्यांसाठी हँड सॅनिटायझरचा पुरेसा पुरवठा करण्यात यावा.

---

६ जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनानुसार: https://www.who.int/emergencies/diseases/novelcoronavirus-2019

५. सर्व पोलिस स्टेशन/ लॉक-अप मध्ये पुढील सूचनांची अंमलबजावणी करण्यात यावी:

अ. पुरुष आणि महिलांसाठीच्या पोलिस लॉक-अपचे दररोज निर्जंतुकीकरण आणि पूर्ण स्वच्छता करण्यात यावी.

ब. सर्व पोलिस कर्मचारी आणि लॉक-अपमधील व्यक्तीसाठी स्वच्छतेच्या उच्च मानकांची अंमलबजावणी करण्यात यावी.

क. पोलिस लॉक-अपमधील प्रत्येक व्यक्तीमध्ये ३ फूटाचे अंतर राहील याची खातरजमा करावी, अगदी रात्रीच्या वेळेस झोपतानादेखील. (पाचव्या भागातील मार्गदर्शन सूचनांनुसार)

ड. पोलिस लॉक-अपमधील प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र साबणाचा नियमित पुरवठा होईल याची खातरजमा करावी. प्रत्येक व्यक्तीला ठराविक वेळाने त्यांचे हात धुण्यास किंवा सॅनिटाईज करण्याच्या सूचना द्याव्यात.

ई. जिथे नळाच्या पाण्याची सुविधा मर्यादित असेल तिथे हँड सॅनिटायझर पुरवण्यात यावे.

फ. पोलिस लॉक-अपमधील प्रत्येक व्यक्तीला त्याचे तोंड शक्य तितके झाकण्यासाठी कापडी मास्क/हातरुमाल /फडके/टिश्यू पेपर देण्यात यावे.

ग. लॉक-अपमधील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याची बारकाईने देखरेख करण्याची सूचना पोलिस स्टेशनमधील निवासी अधिकारी आणि प्रत्येक पोलिस स्टेशनमधील निवडक पोलिस कर्मचाऱ्यांना देण्यात यावी. कोणाही व्यक्तीला सर्दी, खोकला, ताप, श्वास घेण्यास त्रास होत असेल तर त्याला तात्काळ जवळच्या वैद्यकीय केंद्रात चाचणीसाठी घेऊन जावे.

ह. क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन ५४नुसार अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीची अटकेनंतर तात्काळ वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. जर त्या व्यक्तीस कोठडीत ठेवण्यात आले तर त्याची दर ४८ तासांनी वैदयकीय तपासणी होणे बंधनकारक आहे. (डी के बासू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य सरकार या खटल्यात देण्यात आलेल्या सूचनेनुसार)

६. प्रत्यक्ष कृती स्थळावर असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी खालील सुरक्षा नियमांचे पालन करावे:

अ. रस्त्यावरील कोणत्याही व्यक्तीशी शारिरीक संपर्क टाळावा.

ब. सर्वसामान्य नागरिकांशी संवाद साधताना शक्यतो ३ फूटांचे अंतर राखावे.

क. स्वतंत्र हातरुमाल किंवा टॉवेलचा वापर करावा. आपला हातरुमाल इतरांना देऊ नये.

७. घरी परतल्यानंतर तात्काळ करावयाच्या बाबींची स्पष्ट कार्यपद्धती पोलिसांना द्यावी. हात आणि चेहरा धुणे, आंघोळ करणे आणि कपडे बदलणे आणि दररोज पोलिस युनिफॉर्म धुणे या बाबींवर जोर द्यावा.

८. सर्व पोलिस कर्मचाऱ्यांची नियमित कोरोना चाचणी करण्यात यावी, विशेषत: जे पोलिस कर्मचारी रस्त्यांवर कार्यरत आहेत ते सतत जनतेच्या संपर्कात येत असल्यामुळे त्यांची नियमित चाचणी करावी.

९. सर्व पोलिस कर्तव्यांच्या पालनासाठी एक आपत्कालीन प्लॅन बनवावा आणि जे आजारी आहेत त्यांना मदत पुरवावी, जेणेकरून पोलिस दलात कोरोनाचा संसर्ग पसरू नये. या प्लॅनमध्ये पुढील बाबींचा समावेश असावा:

अ. सध्या उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचे व्यवस्थापन करण्यासाठी नेमणुका किंवा जबाबदाऱ्यांचा प्लॅन बनवावा.

ब. कनिष्ठ कर्मचाऱ्यांना विशेषत: कॉन्स्टेबल पदावरील कर्मचाऱ्यांना बरे होण्यासाठी वेळेवर वेतन आणि पुरेशा रजा मिळतील याची खात्री करावी.

क. सर्व अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना पुरवण्यात आलेल्या आरोग्य विम्याअंतर्गत सर्व वैद्यकीय खर्चाचा समावेश करावा.

ड. आवश्यकता असल्यास कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अत्यावश्यक वस्तूंसह मदत पुरवावी.

१०. प्रत्येक पोलिस स्टेशन आणि पोलिस कार्यालयाबाहेर स्थानिक भाषेत सुरक्षित शारिरीक अंतर राखण्याविषयी आणि स्वच्छतेविषयी माहिती देणारे पोस्टर लावावेत.

११. कोरोना विषाणूच्या संसर्गाने बाधितांच्या किंवा लक्षणे असलेल्यांच्या अहवालांवर निगराणी करण्यासाठी संपर्क बिंदू किंवा नोडल अधिकारी म्हणून पोलिस मुख्यालयात एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. हा अहवाल मागितल्यास तात्काळ तो संबंधित कर्मचाऱ्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठवण्यात यावा. पोलिस कर्मचाऱ्यांना आणि कोठडीतील व्यक्तींना कोरोनाची लक्षणे आढळून आल्यास त्याची माहिती वरिष्ठांना असावी यासाठी त्या अहवालाची एक प्रत नोडल अधिकाऱ्याकडे पाठवण्यात यावी.

## II. बळाचा किमान वापर

*सर्वसामान्यांच्या दैनंदिन कामकाजावर आलेल्या अभूतपूर्व निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर, लॉकडाऊनच्या अंमलबजावणीसाठी बळाचा वापर करणे टाळलेच पाहिजे.*[७] *अहिंसक मार्गांचाच वापर करण्यात आला पाहिजे.*

१२. रस्त्यावरील नागरिकांविरोधात बळाचा वापर करण्यापासून प्रतिबंधित करणारे विभागवार परिपत्रक[८] काढून त्याची अंमलबजावणी कठोरपणे झाली पाहिजे. या पत्रकात अहिंसक मार्गांचा अवलंब करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असाव्यात. या परिपत्रकात संयुक्त राष्ट्रसंघाच्या मूलभूत तत्त्वांमधील आठव्या तत्त्वातील बळ आणि शस्त्रांच्या पोलिस दलाने करावयाच्या वापरासंदर्भातील सूचनांचा पुनरोच्चार करण्यात आला पाहिजे. *या मूलभूत तत्त्वापासून दूर जाण्यासाठी अंतर्गत राजकीय अस्थैर्य किंवा इतर सार्वजनिक आपत्कालीन परिस्थितीसारखी स्थिती लागू केली जाऊ शकत नाही.*

१३. जनतेची कारणमीमांसा समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष कृतीस्थळावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधील परिणामकारक संवाद आणि संप्रेषणाचे कौशल्य वाढवण्यात यावे किंवा रस्त्यावर या बाबींचे असलेले महत्त्व लक्षात घ्यावे आणि त्यासाठी आवश्यक मदत पुरवण्यात यावी.

१४. खालील बाबी करण्यापासून पोलिस कर्मचाऱ्यांना अटकाव करावा. या बाबींचा समावेश पोलिसांच्या गंभीर गैरवर्तनात करण्यात यावा आणि त्यासाठी योग्य ती शिक्षा करण्यात यावी.

अ. लॉकडाऊनच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून एखाद्याला मारहाण करणे किंवा मारहाण करत धमकावणे.

---

७ केरळ पोलिस महासंचालकांना लिहिलेल्या पत्रात केरळ उच्च न्यायालयाचे एक न्यायमुर्ती, न्यायमुर्ती देवन रामचंद्रन यांनी महासंचालकांना लॉकडाऊनच्या कथित उल्लघनांविरोधात केरळ पोलिसांनी बळाचा वापर न करण्याची विनंती केली होती. अगदीच आवश्यकता असेल तर आणि त्याही परिस्थितीत किमान बळाचाच वापर करण्यात यावा असे न्यायमुर्तीने लिहिले आहे. २८ मार्च २०२०च्या लाईव्ह लॉ मध्ये याची माहिती देण्यात आली आहे.

८ प्लॅनमध्ये, परिपत्रकात आणि परिपत्रकाला जोडण्यात आलेल्या पुरवणीत बळाचा वापर करू नये याचा पुनरोच्चार करण्यात यावा.

ब. लॉकडाऊनचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली सर्वसामान्यांना लोळायला लावणे, सरपटायला लावणे, पाय दुमडून बसवणे किंवा उठा बशा काढायला लावणे किंवा त्यांना अपमानास्पद क्रिया करायला लावणे.

१५. जेव्हा जीवित किंवा वित्त धोक्यात असेल तेव्हाच बळाचा वापर करण्याची पोलिस दलाला परवानगी द्यावी. अशा परिस्थितीत किमान बळाचाच वापर करावा आणि दुखापत, गंभीर इजा होणे टाळण्यासाठी शक्य ते प्रयत्न करावेत. ज्या घटनेत किमान बळाचा वापर झाला असेल त्या घटनेचा अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे बंधनकारक असले पाहिजे.

१६. बळाचा वापर मार्गदर्शक तत्त्वांमध्ये उल्लेखलेल्या परिस्थितीव्यतिरिक्त इतर प्रसगांत करणे टाळावे यासंदर्भातील मार्गदर्शन, अभिमुखता यांचे आयोजन, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून जेव्हा आवश्यक असेल तेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबरच प्रत्यक्ष कृती स्थळावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी करणे.

## III. अत्यावश्यक सेवांच्या पुरवठ्याची खात्री करणे आणि अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्यांशी पूर्ण सहकार्य

*पोलिस हे सर्वसामान्य जनता आणि अत्यावश्यक सेवा यांच्यामधील संपर्क बिंदू आहेत. यामुळे अत्यावश्यक सेवांचा सुरळीत पुरवठाच होत नाही तर यामुळे लोकांचे जीवदेखील वाचू शकतात. पोलिसांच्या भूमिकेतील ही महत्त्वाची बाब आहे आणि त्याला प्राधान्यक्रम असला पाहिजे.*

१७. प्रत्येक अत्यावश्यक सेवा पुरवण्याचे दळणवळण आणि लोकांचा अत्यावश्यक सेवांपर्यतचा प्रवास वेळीच, विनाअडथळा आणि सुरक्षित व्हावा यासाठी सर्वोतोपरी पावले उचलण्यासाठीच्या सूचना, अभिमुखता आणि साधने प्रत्यक्ष कृतीस्थळावरील अधिकाऱ्यांना द्यावी. यामध्ये पुढील बाबींचा समावेश असावा:

अ. रस्त्यातील अडथळे आणि बंद केलेले रस्ते, गेट यांचे भान राखत माल पोचवणाऱ्या व्यक्तीला इप्सित स्थळी जवळच्या रस्त्याने पोचण्यासाठी मार्गदर्शन करणे.

ब. जवळचे किराणा दुकान, औषधांचे दुकान, एटीएम, हॉस्पिटल, रेशन दुकाने, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि इतर सर्व अत्यावश्यक सेवांची माहिती लोकांना पुरवण्यास सहकार्य करणे.

क. एखाद्या व्यक्तीला वैद्यकीय सेवा किंवा मदतीची आवश्यकता असल्यास जवळच्या हॉस्पिटलपर्यंत पोचण्यास मदत करणे.

ड. नागरी संस्था आणि स्वयंसेवी संस्थापर्यंत अत्यावश्यक सेवा पोचाव्यात यासाठी सहकार्य करणे, समाजातील दुर्बल घटक, जमाती विशेषत: अपंग, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची ओळख पटवून त्यांना सहकार्य करणे.

१८. सरकारने आणि विभागाने आदेश जारी केल्याप्रमाणे आपापल्या राज्यातील सर्व ठरवलेले अत्यावश्यक सेवांचे पुरवठादार यांची पूर्ण माहिती सर्व पातळीवरील सर्व पोलिस कर्मचाऱ्यांना आहे याची खातरजमा करावी.

१९. सर्व अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्यांची यादी विभागीय आदेशद्वारे सर्व पोलिस दलाला देण्यात यावी, यासाठी शक्य त्या सर्व साधनांचा वापर करावा, कर्मचाऱ्यांचे अधिकृत मोबाईल आणि व्हॉट्सअप नंबर इत्यादी, ज्यायोगे पेट्रोलवरील प्रत्येक पोलिस शिपाई, प्रत्येक अधिकारी, कायदा सुव्यवस्थेशी निगडीत प्रत्येक अधिकारी यांना ते रस्त्यावर कर्तव्य निभावत असताना त्यांना या यादीची माहिती सहज उपलब्ध असावी किंवा त्यांच्याजवळ असावी.

२०. अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्यांनी बाळगण्याची आवश्यक असणाऱ्या आणि पोलिसांना दाखवण्यासाठीच्या ओळखपत्र किंवा विशिष्ट कागदपत्र यांचे पूर्ण ज्ञान आणि याबाबतची जागरुकता. प्रत्यक्ष कृतीस्थळावरील अधिकाऱ्यांबरोबरच सर्व पोलिस कर्मचाऱ्यांना असल्याची खात्री करणे.

२१. अत्यावश्यक सेवा पुरवणारे किंवा आम जनता यांनी गरज असल्यास प्रवास करण्यासाठीची प्रक्रिया, अटी, कागदपत्रे आणि गरज असल्यास प्रवास करण्यासाठीचा पास, याबाबतची स्पष्ट माहिती लोकांना उपलब्ध असणाऱ्या माध्यमांद्वारे (प्रांतिय, स्थानिक आणि राष्ट्रीय प्रसारमाध्यमे, खासगी आणि सरकारी दोन्ही) सर्वसामान्यांपर्यंत पोचवण्यात यावी.

२२. प्रवासासाठीचा पास घेण्याची प्रक्रिया ही वेगवान, सोपी असावी आणि प्रत्यक्ष खातरजमा करण्याची आवश्यकता नसेल अशी असेल याची खात्री करावी. सर्वांना हा पास उपलब्ध होईल याची खातरजमा करण्यासाठी ही प्रक्रिया फक्त ऑनलाईन व्यासपीठांचाच वापर करून नव्हे तर टेक्स्ट मेसेज आणि व्हॉट्सअपच्या माध्यमातूनही पूर्ण करण्यात यावी.

२३. जनता विविध सेवांचा लाभ घेत असताना, उदाहरणार्थ किराणा दुकानाबाहेर, रेशन दुकानाबाहेर वाट पाहत असताना, सुरक्षित शारिरीक अंतर राखण्याच्या सूचनांचे पालन करत असल्याची कायम खात्री करून घ्यावी.

## IV. "थांबा, तपासा आणि साहाय्य करा" हा प्रोटोकॉल अंमलात आणा

*रस्त्यावर आढळणाऱ्या लोकांचे नियमन करताना आणि सहकार्य करताना त्यांना प्रश्न विचारताना किंवा आवश्यक प्रतिसाद देताना सहजपणे अंमलात आणता येईल, सोपी, व्यवहार्य अशी कार्यपद्धती किंवा प्रोटोकॉल असल्याने पोलिसांचे काम सुरळीत पार पडेल.*

२४. "थांबा, तपासा आणि साहाय्य करा" हा प्रोटोकॉल विकसित करा ज्यामध्ये रस्त्यावर आढळणाऱ्या लोकांचे नियमन करताना आणि त्यांना थांबवताना पोलिस कर्मचाऱ्यांना उपयोगात आणता येईल अशी एकेक पायरीची कार्यपद्धती असेल.

अ. रस्त्यावर आढळणाऱ्या लोकांना, ते बाहेर असण्याचे कारण समजून घेणारे मूलभूत प्रश्न विचारावे आणि त्याप्रमाणे प्रतिसाद द्यावा. लोकांना विचारण्यात येणारे प्रश्न ती व्यक्ती कुठे जाते आहे, कोणत्या कारणासाठी तिथे जाते आहे, यापुरतेच मर्यादित असावेत.

ब. अत्यावश्यक सेवा लोकांपर्यंत पोचवण्यासाठी विविध प्रकारचे सहकार्य पोलिस देऊ शकतात, यात संबंधित हेल्पलाईन सांगणे याचाही समावेश आहे.

क. लॉकडाऊनच्या नियमांचे खरोखरच केलेले उल्लंघन ओळखण्यासाठीचे उद्दिष्ट आणि स्पष्ट निकष आणि त्यावरील पोलिसांचा योग्य प्रतिसाद शक्य आहे.

## V. अटक आणि ताब्यात घेण्याची मर्यादा[९]

*अनावश्यक ताब्यात घेण्याचे टाळण्यासाठी, लॉकडाऊनचे उल्लंघन केल्याचे आरोप असलेल्यांना अटक करू नये किंवा ताब्यात घेऊ नये यासाठीचा आग्रह धरण्यात येतो. कोठडीतील व्यक्ती आणि पोलिस कर्मचारी एकमेकांच्या सहवासात येऊन त्यांना विषाणूचा संसर्ग होण्याच्या जोखमीत*

---

९. केरळ उच्च न्यायालयाने स्वत:हून (२५ मार्च २०२० ला ) दाखल करून घेतलेल्या याचिकेत- कोविड-१९ (डब्ल्यू पी (सी) नंबर २०२० चा ९४००) म्हटले आहे की लॉकडाऊनमध्ये न्यायालयांपर्यंत पोचण्यास असलेल्या मर्यादेमुळे अगदीच नाईलाज झाल्याशिवाय आणि गंभीर स्वरुपाचा गुन्हा घडल्याशिवाय अटक करण्यात येऊ नये:http://highcourtofkerala.nic.in/downloads/COVID_19_wpc9400_2020_orderdtd25032020.pdf

*न टाकण्याच्या महत्त्वाच्या बाबीला लक्षात घेता पोलिसांनी शक्य असेल तोपर्यंत सर्व अटक किंवा ताब्यात घेणमे टाळले पाहिजे.*

२५. पोलिस कोठडीती मर्यादित जागेमुळे ताब्यात घेतलेली व्यक्ती आणि पोलिस कर्मचाऱ्यांना स्वत:लादेखील विषाणूचा संसर्ग होण्याचा आणि त्यांच्याद्वारे इतरांपर्यंत पसरवला जाण्याचा गंभीर धोका ओळखण्यात यावा आणि त्यासाठीच्या सर्व आवश्यक उपाययोजना अंमलात आणण्याची गरज आहे.

२६. लॉकडाऊनच्या निर्बंधांचे उल्लंघन करण्यासंदर्भात अटक केलेल्या व्यक्तीला जामीन मिळण्याची तरतूद असते यासारख्या सर्वसामान्य कायदेशीर बाबींविषयी पोलिस कर्मचाऱ्यांना माहिती असेल याची खातरजमा करणे.[१०]

२७. एखाद्या व्यक्तीने लॉकडाऊनच्या निर्बंधांचे उल्लंघन केल्यास त्याला अटक करण्यासाठी पोलिस प्रथमदर्शनी दिसणाऱ्या पुरावाजन्य परिस्थितीचा वापर करू शकतात, याची खातरजमा करणे.

२८. लॉकडाऊनच्या निर्बंधाचे उल्लंघन केल्याचा संशय असलेल्या प्रत्येक व्यक्तीला अटक करणे पोलिस अधिकाऱ्यांनी टाळावे, त्याऐवजी त्यांनी ताकीद द्यावी किंवा दंड आकारावा.

२९. कायदेशीर मदतीसाठी वकीलांची निवड करण्यासाठी पोलिस अधिकाऱ्यांना जिल्हा कायदेशीर विभागाशी किंवा तालुका कायदेशीर सेवा समितीशी (जे लागू असेल त्याप्रमाणे) समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात याव्यात. वकील किंवा कायदेशीर सल्लागारांचे नाव आणि संपर्काची माहिती इत्यादी तपशील प्रत्येक पोलिस स्टेशनच्या बाहेर ठेवल्यास लोकांना पोलिस कोठडीत नेण्याचे प्रमाण कमी होईल.

*लोकांना पोलिसांच्या ताब्यात घेणे कमी करा*

३०. क्रिमिनल प्रोसिजर कोडमधील कलम ४१ आणि ४१ अ मधील तरतूदींनुसार सात वर्षांपर्यंत शिक्षा असणाऱ्या सर्वच गुन्ह्यांच्या बाबतीत अधिकाऱ्यांनी अटक करू नये, असे लेखी कारणासह निर्देश देण्याचा ठोस नियम लागू करण्यात यावा.

---

१० उदाहरणार्थ, भारतीय दंड संहितेच्या कलम १८८, २६८, २७०, २७१ अंतर्गत, महामारीच्या आजारांचा कायदा १८९७ (कलम २ आणि २) आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ (कलम ५१ ते ६०)

३१.  सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असणाऱ्या गुन्ह्यांमध्येदेखील जर क्रिमिनल प्रोसिजर कोडअंतर्गत असणाऱ्या नियमांनुसार अटक करणे अत्यावश्यक नसल्यास अटक करणे टाळण्यात यावे. कोणतीही अटक ही घटनात्मक तरतूदी आणि क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या कार्यपद्धतीनुसार आणि अधिकारांनुसारच करण्यात यावी.

३२. कोरोना महामारीच्या काळात कोणतीही प्रतिबंधात्मक अटक करण्यास पोलिस कर्मचाऱ्यांना मनाई करण्यात यावी.

३३. सर्व प्रकरणात पोलिस लॉक-अप मधील व्यक्तींना जामिनांवर सोडताना न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणेच कारवाई करावी किंवा न्यायलायची परवानगी घ्यावी.

## VI. पोलिसांच्या गैरवर्तनाची नोंद

*लॉकडाऊनची अंमलबजावणी करताना बळाचा वापर करणे, अटक करणे, ताब्यात घेणे, सार्वजनिक आणि अत्यावश्यक सेवांचे नियमन करणे यासारख्या बाबींमध्ये कोणत्याही पोलिस कर्मचाऱ्याकडून कायद्याचे उल्लंघन झाल्यास किंवा कायदेशीर बाबींचे पालन न झाल्यास त्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी.*

३४. लॉकडाऊन लागू करताना घालून दिलेल्या कार्यपद्धतींचे आणि मानवाधिकारांच्या निकषांचे सर्व स्तरावर कठोर पालन करणे यावर भर द्यावा.

३५. प्रत्येक पोलिस स्टेशनने, विशेषत: थांबा, तपासा आणि साहाय्य करा प्रोटोकॉलची अंमलबजावणी रस्त्यावर करण्याची जबाबदारी असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी, पुनरावलोकन करताना आणि अधिकारी त्यांच्या जबाबदाऱ्यांचे पालन करत आहेत, हे सुनिश्चित करताना यासंदर्भातील अहवाल प्रक्रिया तंतोतंत पाळावी.

३६. ज्या पोलिस कर्मचाऱ्यांवर गैरवर्तन केल्याचा किंवा गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केल्याचा आरोप असेल त्यांच्याविरुद्ध तक्रार नोंदवणे सर्व नागरिकांना सोपे होईल याची खातरजमा करावी. यासाठी एक समर्पित हेल्पलाईन असावी आणि तिचे नंबर सर्वत्र प्रकाशित केलेले हवेत. प्रत्येक तक्रारीची दखल घेणे आणि त्याला प्रतिसाद देणे, यासंदर्भात नेमकी काय कारवाई करावी याच्या स्पष्ट सूचना देत, त्याची अंमलबजावणी पर्यवेक्षण अधिकाऱ्यांना बंधनकारक करावी.

३७. पोलिस कर्मचाऱ्यांच्या हुद्द्याचा विचार न करता त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करावी, विभागीय किंवा गुन्हेगारी स्वरुपाची (जशी आवश्यकता असेल) ज्यांनी:

अ. अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्यांना त्यांचे काम करण्यापासून रोखणे, अडथळा निर्माण करणे किंवा मर्यादा घालणे.

ब. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना किंवा पुरवठादारांना मारहाण करणे किंवा जायबंदी करणे

क. व्यक्तींविरोधात अनियंत्रित किंवा अपमानास्पद बळाचा वापर करणे.

ड. अनावश्यक आणि बेकायदेशीररित्या व्यक्तींना ताब्यात घेणे किंवा अटक करणे.

*जर वर उल्लेख केलेल्या मुद्द्यांसंदर्भात खटला भरण्यात आला आणि संबंधित पोलिस कर्मचाऱ्याला कोठडीत ठेवण्यात आले नाही तर त्याला ताबडतोब त्याच्या सेवेतून निलंबित करावे आणि लवकरात लवकर त्याच्याविरोधात कायदेशीर प्रक्रिया सुरू करावी.*

## VII. असुरक्षित घटकांना संरक्षण द्यावे

*काही असुरक्षित घटकांना मदत घेण्यास आणि सेवा मिळवण्यास अवघड असते, लॉकडाऊनच्या काळात ते आणखी अवघड होईल. लॉकडाऊनमधील निर्बंधांमुळे अशा अडचणीत किंवा संकटात सापडू शकणाऱ्या लोकांची ओळख पटवणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.*

३८. महिला, बालके, आजारी, ज्येष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती किंवा इतर घटक ज्यांना लॉकडाऊनच्या निर्बंधामुळे मोठा फटका बसेल अशा व्यक्तींच्या विशेष गरजांकडे लक्ष देण्यासाठी खास उपाय करावेत आणि पुढीलप्रमाणे योजना तयार कराव्यात,

अ. रेशन किंवा औषधे त्यांच्या निवासस्थानापर्यंत पोचवण्यासाठी साहाय्य करावे.

ब. हॉस्पिटल, बँक, रेशन दुकान किंवा किराणा दुकान किंवा इतर अत्यावश्यक सेवांपर्यंत पोचण्यासाठी त्यांना मदत करावी.

क. आजारी, ज्येष्ठ नागरिक आणि अपंग व्यक्ती किंवा इतर गरजू यांना आवश्यकता असल्यास सातत्यपूर्ण वैद्यकीय किंवा इतर आवश्यक सेवा पुरवण्यात साहाय्य करावे.

ड. जर शक्य असेल असेल अशा व्यक्तींना नियमित फोन करून त्यांच्या गरजांची विचारपूस करणे.

३९. असुरक्षित गटांना तोंड द्यावे लागत असलेल्या अडचणी आणि सुरक्षेच्या बाबींची दखल घ्यावी. यात बेघर, स्थलांतरित मजूर, वेश्या व्यवसायातीशी निगडीत व्यक्ती, तृतियपंथी, अल्पसंख्यांक, असुरक्षित घरातील महिला आणि बालके आणि द्वेषयुक्त गुन्ह्यांसाठी संवेदनाक्षम असणाऱ्या ईशान्येकडील जमाती यांच्या अडचणींची दखल घ्यावी. सुरूवातीला हे पुढीलप्रमाणे करता येईल:

अ. कोणत्याही गरजू व्यक्तीसाठी विशेष मदत सेवा किंवा धोरणे आखणे.

ब. नागरी संस्था आणि इतर संबंधितांनी कोणाही आवश्यकता असणाऱ्यासाठी संदर्भ गोळा करून ठेवणे.

क. पोलिसांच्या उपस्थितीची आणि प्रतिसादाची खात्री, गरज असणाऱ्यांना द्यावी.

४०. अल्पसंख्यांक समुदायाच्या गरजा आणि तक्रारी समजून घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधावा, त्यांना खात्री द्यावी, त्यांच्या सूचना स्वीकाराव्यात यासाठी प्रत्येक पोलिस स्टेशन आणि जिल्हा पातळीवर विशेष आणि निश्चित उपाय कराव्यात. पोलिसांचा प्रतिसाद या बाबींवर आधारित असावा.

## VIII. भेदभाव करू नये आणि सर्वांनाच उपलब्ध व्हावे

*नागरिकांना प्रतिसाद देताना पोलिसांनी भेदभाव करू नये आणि भेदभावाच्या कोणत्याही घटना घडत असताना किंवा देखरेख करत असताना याबाबत दक्ष राहावे.*

४१. भारताच्या राज्यघटनेच्या प्रकरण १४ मध्ये ग्वाही दिल्याप्रमाणे सर्वांना कायद्यासमोर समान लेखावे. भारताच्या राज्यघटनेने ग्वाही दिल्याप्रमाणे जन्मस्थळ, जात, लिंग, वंश, धर्म याच्या आधारावर कोणत्याही नागरिकाशी भेदभाव न करता सर्व पोलिस कर्तव्ये नि:पक्षपातीपणे पार पाडावीत.

४२. समाजातील किंवा पोलिस कर्मचाऱ्यांद्वारा एखाद्या वंशाविरुद्ध, धर्माविरुद्ध, जातीच्या आधारावर किंवा विशिष्ट व्यक्तींच्या विरोधात वक्तव्ये किंवा कृती केलेल्या असल्यास त्याविरुद्ध दक्ष असावे आणि मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या नियमांप्रमाणे कायदेशीर कारवाई करावी.

४३. कोणत्याही पोलिस कर्मचाऱ्याकडून झालेली कोणतीही भेदभावयुक्त कारवाई आणि / किंवा असंवेदनशील कृती किंवा वर्तवणूक याच्याविरुद्ध मार्गदर्शक तत्त्वांनुसार तात्काळ चौकशी करावी.

४४. पोलिसांबद्दल समाजात विश्वास निर्माण करणारे विशेष उपाय आणि योजना तयार करणाऱ्या प्रत्यक्ष कृतीस्थळावरील पोलिस कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन द्यावे.

## IX. स्पष्टपणे संवाद साधा आणि दृष्यमान व्हा

*लॉकडाऊनच्या पूर्ण कालावधीत, लॉकडाऊनची अंमलबजावणी करताना, त्यासंबंधीच्या घडामोडी घडत असताना, पोलिस प्रमुखांकडून पोलिस दलातील सर्वच पातळ्यांवर सातत्यपूर्ण आणि एकत्रित संवाद साधला पाहिजे आणि त्याची खात्री केली पाहिजे.*

*पोलिस दलाअंतर्गत*

४५. लॉकडाऊनच्या परिस्थितीसंदर्भात संबंधित आणि ताजी माहिती, केंद्र आणि राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांसह आणि योजना या सोप्या, सहज समजतील अशा स्वरुपात आणि भाषेत सर्व पर्यवेक्षक अधिकारी, पोलिस स्टेशनचे अधिकारी, जिल्हा पोलिस प्रमुख, विविध विभागांचे प्रमुख, झोनचे प्रमुख अधिकारी आणि इतर पोलिस अधिकारी यांच्यापर्यंत पोचतील याची खातरजमा करावी.

४६. पोलिस स्टेशन, जिल्हा, रेंज आणि मुख्यालयांकडून शक्य असल्यास व्हिडिओ किंवा कॉन्फरन्स कॉलच्या माध्यमातून दररोज सर्वच पातळ्यांवर माहिती घेण्यात यावी आणि अद्ययावत माहिती सर्वच पातळ्यांवर देण्यात यावी आणि तिचा दस्तावेज राखावा आणि लॉकडाऊनसंदर्भातील कारवायांचा, आणि गरज असल्यास विशिष्ट कारवायांचा आढावा घ्यावा.

४७. रोजची माहिती घेताना पोलिस कर्मचाऱ्यांनी घ्यावयाच्या सर्व संबंधित आणि ताजी सावधगिरीची पावले याबद्दल पोलिस कर्मचाऱ्यांना पुन्हा पुन्हा सांगितले जाईल याची खातरजमा करावी.

४८. लोकांशी संवाद साधणारे आणि गस्त घालण्यात येणाऱ्या परिसराबद्दल जबाबदार असणारे गस्ती अधिकारी यांना लॉकडाऊनची योजना पूर्णपणे माहित आहे आणि उचलायच्या प्रत्येक पावलाबद्दल त्यांना पुरेशी स्पष्टता आहे यासाठी एकत्रितरित्या प्रयत्न करणे.

४९. नियमित अंतराने योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा जनतेसोबत घ्या.

*जनतेसोबत*

५०. लॉकडाऊनच्या काळात व्हिडिओ, सोशल मीडिया, विशेषत: ट्विटर यांच्या माध्यमातून जनतेला पोलिसांच्या उपस्थितीची खात्री द्यावी आणि रेडिओच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचण्याची खात्री करा.

५१. लॉकडाऊनच्या काळात जनतेच्या जबाबदाऱ्या सांगणारी आणि समजण्यायोग्य माहिती कृतीशीलपणे प्रसारित करा. यामध्ये निर्बंध असणारी ठिकाणे, लॉकडाऊनच्या निर्बंधांचे उल्लंघन केल्यास केली जाणारी कारवाई आणि आकारले जाणारे दंड यासह संबंधित माहिती जनतेला द्या. कोणत्या कारवाया केल्या जाऊ शकतात आणि अत्यावश्यक सेवांची उपलब्धता, विविध माध्यमे, पोलिस आणि सरकारच्या वेबसाईटसह, वर्तमानपत्रे, टीव्ही, न्यूज चॅनेल, रेडिओ, ऑनलाईन न्यूज पोर्टल, पत्रके, सार्वजनिक ठिकाणांजवळील होर्डिंग, नागरी वस्त्यांमधून लाऊडस्पीकरच्या माध्यमातून घोषणा, सोशल मीडिया आणि इतर योग्य माध्यमातून सर्व थरांवर जनतेपर्यंत माहिती प्रसारित करण्यात यावी.

५२. ज्यांना वाचता येत नाही किंवा फारच अत्यल्प वाचता येते आणि ज्या लोकांच्या विशिष्ट गरजा आहेत अशांसह सर्वच लोकांपर्यंत माहिती पोचते आहे याची खातरजमा करण्यासाठी पावले उचलावीत.

५३. कोरोना संसर्गाचे संकट आणि सरकार/पोलिसांच्या उपाययोजना याबद्दल लोकांना संबंधित अद्ययावत माहिती नियमितपणे देण्यात यावी.

५४. आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक लोकांशी नियमित संपर्क राखण्यासाठी, पोलिस अधिकाऱ्यांनी, शारीरिक अंतर राखण्यासह इतर आवश्यक ती सावधगिरीची पावले उचलत, त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या कुटुंबांना देण्यात येणाऱ्या साप्ताहिक भेटींना प्राधान्यक्रम द्यावा. यामुळे नागरिक तोंड देत असलेल्या अडचणी पोलिसांना समजून घेता येतील आणि त्यासाठी अनुरूप पावले उचलता येतील. स्थानिक प्रशासनाशी आणि / किंवा इतर अत्यावश्यक सेवांशी समन्वय साधणे याचाही यात समावेश आहे.

## सीएचआरआय विषयी

कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह (सीएचआरआय) ही एक स्वतंत्र, स्वयंसेवी, ना-नफा संस्था आहे. या संस्थेने १९८७ पासून राष्ट्रकुल देशांमधील मानवी हक्कांच्या प्रश्नांची वकिली करण्याबरोबरच त्याबाबत प्रबोधन आणि संघटनदेखील केले आहे. ‘कॉमनवेल्थ ऑफ नेशन’च्या 53राष्ट्रांच्या संघटनेने सदस्यांना समान सामायिक कायद्याचा आधार दिल्याने सदस्य देशांमध्ये मानवी हक्कांच्या मुद्द्यांवर फारसे लक्ष दिले गेले नाही, म्हणून १९८७ मध्ये काही तज्ज्ञ राष्ट्रकुल संघटनांनी `सीएचआरआय`ची स्थापना केली.

संशोधन, अहवाल, वकिली, गुंतवणूक, संकलन आणि नियतकालिक तपासणीद्वारे `सीएचआरआय` मानवी अधिकारांच्या मुद्द्यांसंदर्भातील प्रगती आणि अडचणींकडे लक्ष वेधते. ही संस्था राष्ट्रकुल सचिवालय, संयुक्त राष्ट्र मानवी हक्क परिषदेचे सदस्य, माध्यमे आणि नागरी समाजाला संबोधित करते. त्या सोबतच लोकशिक्षणाचे उपक्रम, धोरणविषयक संवाद, तुलनात्मक संशोधन, माहिती आणि न्यायाची सर्वसामान्यांना उपलब्धता या मुद्द्यांवर कार्य करते.

`सीएचआरआय` मानवाधिकारांची सार्वत्रिक तत्वे, राष्ट्रकुल हरारे तत्वे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त मानवाधिकार साधने तसेच मानवी हक्कांना पाठिंबा देणारी देशी साधने यांचे पालन करण्याचा प्रयत्न करते. `सीएचआरआय`चे मुख्यालय भारतात नवी दिल्ली तसेच इंग्लंडमध्ये लंडन तसेच घाना देशातील अक्रा येथे आहेत.

**आंतरराष्ट्रीय सल्लागार आयोग** : ॲलिसन डक्सबरी (अध्यक्ष) सदस्य : वजाहत हबीबुल्ला, जोआना एवार्ट-जेम्स, एडवर्ड मॉर्टिमर, सॅम ओकुडजेटो आणि संजॉय हजारिका

**कार्यकारी समिती (भारत)** : वजाहत हबीबुल्ला (अध्यक्ष) सदस्य : किशोर भार्गव, बी. के. चंद्रशेखर, जयंतो चौधरी, माजा दारूवाला, नितीन देसाई, कमल कुमार, मदन बी. लोकूर, पूनम मुत्रेजा, जेकब पुन्नूज, विनीता राय, ए. पी. शाह आणि संजॉय हजारिका

**कार्यकारी समिती (घाना)** : सॅम ओकुडझेटो (अध्यक्ष) सदस्यः अकोटो अंपाव, वजाहत हबीबुल्ला, कोफी क्वाशीगाह, ज्युलिएट तुआकली आणि संजॉय हजारिका

**कार्यकारी समिती (यूके)** : जोआना एवर्ट-जेम्स (चेअरपर्सन) सदस्य : रिचर्ड बॉर्नी, प्रलब बरुआ, टोनी फोरमन, नेव्हिल लिंटन, सुझान लेम्बर्ट आणि संजॉय हजारिका.

**आंतरराष्ट्रीय संचालक** : संजॉय हजारिका
© कॉमनवेल्थ ह्युमन राईट्स इनिशिएटिव्ह, २०२०. मूळ स्त्रोताला योग्य ती पोचपावती देऊन या अहवालातील माहिती-मजकुराचा वापर करू शकता.


| **सीएचआरआई मुख्यालय, नवी दिल्ली** | **सीएचआरआई, लंडन** | **सीएचआरआई अफ्रीका, अक्रा** |
|---|---|---|
| 55ए, तीसरा मजला, सिद्धार्थ चैम्बर्स कालू सराय, नई दिल्ली १०००१७ भारत | रूम न0 219, स्कूल ऑफ एडवांस्ड स्टडी, साउथ ब्लाक, सिनेट हाउस मालेट स्ट्रीट, लंदन WCIE7HU यूनाइटेड किंग्डम | डा० स्टैनली मार्बल प्लाज़ा हाउस न0 158/2 असाइलम डाऊन अक्करा घाना |
| टेलफोनः +९१ ११४३१८०२०० | | टेलीफोन/फैक्सः +२३३ ३०२ ९७११७० |
| फैक्सः +९१ ११४३१८०२१७ | | |
| ई-मेलः info@humanrightsinitiative.org | ई-मेल london@humanrightsinitiative.org | ई-मेलः chriafrica@humanrightsinitiative.org |

**www.humanrightsinitiative.org**